# प्रकरण - दुसरे

# 'मृणालिनी देसाई' यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण - दुसरे
# 'मृणालिनी देसाई' यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

## अ) 'मृणालिनी देसाई' यांचे अल्पचरित्र :-

पहिल्या प्रकरणामध्ये मराठी कादंबरीचा उदय आणि विकास याचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या सुरुवातीला 'मृणालिनी देसाई' यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ओळख करून घेणे अगत्याचे आहे. एखाद्या साहित्यिकांची साहित्यकृती समजावून घेत असताना त्या साहित्यिकाचे अल्पचरित्र माहीत असणे आवश्यक असते. म्हणूनच 'मृणालिनी देसाई' यांचा आपण प्रथम परिचय करून घेऊ.

❖ **व्यक्तिपरिचय :-**

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | सौ. मृणालिनी प्रभाकर देसाई |
| जन्म | :- | ७ ऑक्टोबर १९२७ |
| मृत्यु | :- | २९ नोव्हेंबर १९९४ |
| पत्ता | :- | जुना मोर बंगला,<br>टागोर रोड, सांताक्रुझ, मुंबई |
| शिक्षण | :- | एम. ए. |
| पुस्तक संख्या | :- | ३६ |
| साहित्य प्रकार | :- | ललितगद्य, कथा, कादंबरी, बालसाहित्य, अनुवाद |

कथा, कादंबरी, ललितगद्य, बालसाहित्य आणि अनुवाद या सर्व वाङ्मयक्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या लेखिका म्हणून, 'मृणालिनी देसाई' हे नाव सर्वपरिचित आहे. त्यांच्या साहित्याला लोकमान्यता आणि राजमान्यता प्राप्त झाली. वाचकांच्या मनावरही त्यांच्या साहित्याचा प्रभाव होता. सुरूवातीस त्यांनी अनेक

चरित्रपर पुस्तके लिहिली.

'मृणालिनी देसाई' यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९२७ साली मुंबईत झाला. त्या पूर्वाश्रमीच्या 'मृणालिनी धनेश्वर' होत्या. त्यांचा जन्म सधन कुटुंबात झाला होता. घरातील वातावरण संस्कारशील होते. त्या वडिलांना 'नाना' म्हणून संबोधत असत. मृणालिनी देसाई यांना एक भाऊ होता, बहीण नसल्यामुळे त्या म्हणतात, ''त्यामुळे बहिणींची जोडी पाहिली की, आपल्याजवळ नसलेल्या खेळण्याकडे पहावे तशी पहायची मी.''[१] लहान वयापासूनच त्यांना स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घ्यावासा वाटत होता. याच कारणामुळे त्यांच्यावरती महात्मा गांधीजींचा प्रभाव पडला होता. ''काही माणसे अंत:प्रेरणेवरच आपल्या जीवनाचे ध्येय ठरवीत असतात. मृणालिनीताईंचेही तसेच झालेले असावे. नाहीतर वयाच्या तिसऱ्या वाढदिवसाला शिवलेला परदेशी कपड्याचा सुंदर फ्रॉक त्यांनी परदेशी कपड्याच्या होळीत फेकला नसता, इंदिरा गांधीजींनीसुद्धा आपली सुंदर परदेशी बनावटीची बाहुली परदेशी वस्तूंच्या होळीत टाकली. त्या घटनेचे येथे स्मरण होते.''[२] मृणालिनी देसाई यांचे प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षण 'मुंबई' येथे पूर्ण झाले. मॅट्रीकला असताना त्या वसतिगृहात रहात असत. 'मॅट्रीकची' परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना खूप आनंद झाला होता. शालेय जीवनाविषयी त्या म्हणतात, ''शालेय जीवनातला आनंद, गंमती - जमती, आठवणींचे कप्पे, ते सारे जगच कसे मोहक होते.''[३] मृणालिनी ताईंचे वास्तव्य - गिरगावातल्या एका चाळीत होते, 'मुंबई' येथील प्रभाकर देसाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. आई व वडिलांच्यामुळे त्या आपले शिक्षण पूर्ण करू शकल्या.

'मृणालिनी देसाई' यांनी लग्नानंतरही स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला होता. लग्नानंतर पहिल्यांदाच त्या माहेरी येतात तेव्हा त्या म्हणतात, ''मी माझ्या मंगळागौरीसाठी माहेरी आले होते, लग्नानंतर पहिल्यांदाच आले होते.''[४] स्वातंत्र्य

लढ्यातील सहभागामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. त्यांच्यावर म. गांधींजींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. सेवाग्राममध्ये त्यांनी म. गांधीजींची भेट घेतली, पं. नेहरू, पटेल या नेत्यांच्या व्याख्यांनामुळे त्यांचे देशप्रेम अधिकाधिक चेतविले गेले म्हणून त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी मरण पत्करण्याची शपथ घेतली होती. तुरुंगामध्ये असताना तेथील हालअपेष्टा त्यांच्या वाट्याला आल्या होत्या; परंतु त्यांनी न डगमगता हे सर्व सहन केले. १५ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. गांधीवधामुळे मृणालिनीताईंचे मन विव्हल झाले होते. स्वातंत्र्यानंतर 'मृणालिनी देसाई' यांनी 'समाजसेवा' करून मातृभूमीविषयीचे प्रेम आणि महात्मा गांधीजींच्याबद्दलचा आदर आपल्या हृदयात सदैव तेवत ठेवला.

स्वत:च्या जीवनातील चढउतारांचे चित्रण करणारे 'निशिगंध' (१९६८) हे त्यांचे आत्मवृत्त उल्लेखनीय असून ते 'मृणालिनी देसाई' यांच्या संपूर्ण जीवनाचे चरित्र नाही. बालवयापासून देशभक्तीच्या भावनेने भारावून गेलेल्या मृणालिनीताईंनी १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला झोकून दिले. त्या लढ्यात त्यांना आलेल्या अनुभवांचे कथन करणे हीच प्रेरणा घेऊन त्यांनी 'निशिगंध' हे आत्मवृत्त लिहिले.

मृणालिनी देसाई यांना लहानपणापासून वाचनाची आवड होती. कथालेखिका, कादंबरीकार, आत्मचरित्रकार, प्रवासवर्णनकार म्हणून त्यांनी मराठी साहित्यात नावलौकिक मिळविला. त्यांचे साहित्य विविध अंगानी नटलेले आहे. त्यांनी हिंदी, गुजराती व मराठी या भाषेमधून लेखन केले. सुरुवातीला त्यांनी चरित्रपर पुस्तके लिहिली. 'मृणालिनी देसाई' या ध्येयवादी व लढाऊ वृत्तीच्या होत्या. गांधीजींच्या जीवनावर त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र धरून त्यांनी 'पुत्र मानवाचा' (१९६८) ही कादंबरी लिहिली. "गांधीजींची व्यक्तिरेखा, भोवतीच्या कालपटासह व स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाच्या घटनांचे चित्रण करीत त्यांनी साकार केली आहे."[५] मृणालिनी देसाई साहित्य लेखनात रमल्या व अविरत लेखन करीत राहिल्या.

'मृणालिनी देसाई' यांच्या चरित्रपर लेखनात 'गीतगोविंदकार जयदेव' (१९५७), 'अलौकिक शिल्पकार मायकेल एंजलो' (१९५९) हे ग्रंथ उल्लेखनीय वाटतात. 'मेघाणी' 'जीवनसरिता' (१९६४), 'सरस्वतीचंद्र' (१९७३), 'सॉक्रेटिस' (१९७६), 'दीपनिर्माण' (१९८३) हे अनुवादित साहित्य आहे. 'आनंदयात्रा' (१९७२), 'रूसवा' (१९७६), 'सोसलेले घाव' (१९७६), 'बिंदी' (१९७७) इ. कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांनी सुमारे वीस कादंबऱ्या लिहिल्या असून त्यात 'कान्होजी आंग्रे' ही ऐतिहासिक 'भगवान परशुराम' (१९७०) ही पौराणिक, 'बिल्वदल' (१९७५) ही अहिल्याबाई होळकरांच्या जीवनावरची, 'इनामदार' (१९९४) ही सामाजिक 'बेडरूम', 'जिंदगी', 'राखेतील निखारे', 'चिरयात्री', 'राजघाट' कादंबरी होय. अशा अनेक कादंबऱ्यांचा समावेश आहे.

'मृणालिनी देसाई' यांनी आपल्या आयुष्यात प्रथम स्वातंत्र्याला व समाजसेवेला अधिक महत्त्व दिले. त्यांनी स्त्रीला 'सबला' बनविले. स्त्रीचे कर्तृत्व समाजापुढे आणले. त्यांनी अंतरिक प्रेरणेने देशसेवा केली. अशा थोर स्वातंत्र्यसेनानी लेखिकेचा मृत्यु मुंबई येथे २९ नोव्हेंबर १९९४ रोजी झाला. मृणालिनी देसाई यांच्याविषयी स्त्री साहित्याचा मागोवा यात नमूद केलेले विधान सार्थक वाटते "ज्या ज्या स्त्रियांनी समाजसेवा, देशसेवा हे आपले ब्रीद मानले ते त्यांनी आपण समाजाच्या नजरेत भरावे या हेतूने नव्हे तर 'आतून' तळमळ वाटत होती म्हणून; परंतु काळाच्या हाकेला 'ओ' देण्याची अंत:शक्ती स्त्रीमध्ये असते. याचा प्रत्यय स्त्रियांच्या अशा कार्यामधून येतो, ही गोष्ट स्त्री जीवनातील स्थित्यंतराच्या इतिहासात नमूद करावी लागते."[६] मृणालिनी देसाई यांच्या वाङ्मयात परिणामकारक व्यक्तिचित्रे, विविध नाती उलगडणारे मनोविश्लेषण, प्रत्यकारी संघर्ष, वाचकांची उत्सुकता वाढविणारे शीर्षक, आशयास साजेशी व कल्पकतेचा आविष्कार करणारी साधी सोपी भाषा, निवेदन पद्धतीची विविधता व

भावनांचा हळुवार अविष्कार ही वैशिष्ट्ये आढळतात.

**ब) वाङ्‌मयीन परंपरा :-**

कोणतीही कला जन्मजात असावी लागते किंवा ती परंपरेने संक्रमित व्हावी लागते. वाङ्‌मयाविषयी असेच म्हणावे लागते. साहित्यिक साहित्य निर्माण करताना आपले नाते परंपरेशी जोडण्याचा प्रयत्न करत असतो. साहित्य हे लेखकाशिवाय होऊच शकत नाही. प्रतिभाशक्तीचे सामर्थ्य असणारा साहित्यिक विश्वसनीय वाङ्‌मय निर्मिती करीत असतो. 'मृणालिनी देसाई' अशाच प्रतिभाशक्तीच्या माध्यमातून साहित्यसाधना करताना दिसतात. त्यांना अनेक थोर साहित्यिकांची वाङ्‌मयीन परंपरा लाभलेली दिसून येते. गांधीवादी विचारांचे प्रणेते 'काकासाहेब कालेलकर' यांच्या वाङ्‌मयाची परंपरा 'मृणालिनी देसाई' यांच्या वाङ्‌मयामध्ये प्रकर्षाने दिसून येते.

'काकासाहेब कालेलकर' यांच्या वाङ्‌मयाची छाप 'मृणालिनी देसाई' यांच्या वाङ्‌मयावर निश्चितच पडलेली आहे. दोघांचे साहित्य परस्परांशी नकळत नाते सांगून जाते. दोघांच्याही साहित्याचा पिंड सारखाच आहे. गांधीवादाचा प्रभाव दोघांच्याही साहित्यावर प्रकर्षाने जाणवतो. कालेलकर यांच्या मार्गदर्शनाने 'मृणालिनी देसाई' यांनी गांधीजींच्या जीवनावर त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र धरून 'पुत्र मानवाचा' (१९६८) ही कादंबरी लिहिली. काकासाहेब कालेलकर यांची व महात्मा गांधीजींची भेट १९१५ मध्ये झाल्यानंतर ते साबरमती आश्रमातच वास्तव्यास होते. यामुळेच 'मृणालिनी देसाई' यांना गांधीजींच्या चरित्राविषयी अधिक माहिती मिळत गेली. त्याचवेळी 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी साकार झाली.

'काकासाहेब कालेलकर' यांनी इंग्रजांबद्दल केलेल्या लेखनामुळे त्यांना इ. स. १९२३ साली कारावास सहन करावा लागला. तेथेच त्यांनी 'उत्तरेकडील भिंती' हे पुस्तक लिहिले. हा आदर्श मृणालिनी देसाई यांनी जपला. त्यांनीही अनेक वेळा तुरुंगवास भोगला. कालेलकर काही काळ गुजरात विद्यापीठाचे प्राचार्य होते. त्यांची ६० गुजराती भाषेतील



16398

पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांची प्रेरणा घेऊन 'मृणालिनी देसाई' यांनी लेखन केले. त्यांनी 'गुलाबदास ब्रोकर' यांच्या पुस्तकाचे अनुवाद लेखन 'जीवन सरिता' या नावाने केले. गुजरातीविषयी मृणालिनी देसाई म्हणतात, ''गुजराती भाषा ही मराठीला तशी खूपच जवळची, सह्याद्रीच्या कडेपठारावर राहणाऱ्या आपल्यासारख्या माणसांना जशा विंध्य, अरवली, गिरनारच्या कथा आपल्या वाटतात. तशाच या शहरी कथा, पांढरपेशांच्या कथा, भाषा वेगळी, शैली वेगळी, पण गाभा सारखाच.''[७]

मृणालिनी देसाई यांनी अनेक पौराणिक व ऐतिहासिक साहित्य लिहिले. १९७६ साली 'रुसवा' हा कथासंग्रह याचेच उदाहरण आहे. त्यामध्ये असामान्य स्त्री - पुरुषांच्या प्रेमभावना वाचण्यात सामान्य वाचकाला आनंद वाटतो. काकासाहेबांच्या 'लोकमाता' या अनुवादाप्रमाणेच 'मृणालिनी देसाई' यांची 'बिल्वदल' (१९७५) ही कादंबरी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर लिहिली आहे. अहिल्याबाईंच्या बालपणापासून या कादंबरीला प्रारंभ होतो. एक स्त्री म्हणून राज्यकारभार करताना त्यांना खूप त्रास सहन करावा लागतो; परंतु त्यांच्याजवळ आत्मविश्वास असल्यामुळे महादजी शिंदेंना त्या ठणकावून सुनावतात - ''सुपारीचे खांड तोंडात टाकून गट्ट करावे तसे तुम्ही घरच्या बायकांविषयी बोलता आहात, ज्या दिवशी तुमच्या फौजा इंदूराच्या दिशेने कूच करतील ती मोठी चूक होईल आणि शिपाई, प्यादी, हजारो मरतील.''[८]

कालेलकरांची असणारी देशप्रेमविषयक जाणीव ही प्रत्यक्षात मृणालिनी यांच्यामध्ये प्रगट झाली आहे. वाङ्मयाच्या दृष्टीनेही दोघांचे कार्य वाखाणण्यासारखे आहे. एक स्त्री स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी होते. 'मृणालिनी देसाई' यांच्या 'निशिगंध' या आत्मचरित्रात याचा प्रत्यय येतो. या आत्मचरित्राविषयी स्त्री साहित्याचा मागोवा यामध्ये म्हटल्याप्रमाणे, ''स्त्रीचे बाणेदार, लढाऊ, निश्चयी, ध्येयवादी रूप येथे दिसते. स्त्रीची अबला ही प्रतिमा बदलून ती सबला होऊ लागण्याच्या खुणा अशा

आत्मानुभवाच्या आविष्कारात आढळतात. 'चूल आणि मूल' या वर्तुळाचा भेद करून स्त्री नवी नवी क्षितिजे कवेत घेऊ लागली ही गोष्ट, स्त्रीचे कर्तृत्व समाजाच्या डोळ्यांपुढे आले. या दृष्टीने अभिमानास्पद आहे.''[१] अर्थात ज्या ज्या स्त्रियांनी समाजसेवा, देशसेवा हे आपले ब्रीद मानले ते त्यांनी आपण समाजाच्या नजरेत भरावे या हेतूने नव्हे तर, 'आतून तळमळ वाटत होती म्हणून. काळाच्या हाकेला प्रतिसाद देणारी स्त्री म्हणून 'मृणालिनी देसाई' यांचा उल्लेख करावा लागतो.

'मृणालिनी देसाई' यांना जरी वाङ्मयीन परंपरा लाभली असली तरीही त्यांच्या साहित्याचा पिंड वेगळा दिसतो. स्वत:ची एक वेगळी छाप पाडण्यात त्यांचे साहित्य यशस्वी झाले आहे. त्यांचे साहित्य परंपरेशी नाते सांगते आणि वाङ्मयाला सतत नवीन ऊर्जा निर्माण करून प्रेरणा देण्याचे काम करताना दिसते.

एक सहृदय लेखिका, देशप्रेमाने भारलेली देशभक्त, जीवनाकडे आशावादी दृष्टिकोनातून बघणारी लेखिका, भारतीय स्वातंत्र्यासाठी लढण्याची जिद्द व धैर्य असणारी सबला नारी, कर्तव्य कठोर, तितकीच सौम्य, मृदुता असणारी, परंपरांचे अनुसरण करणारी सिध्दहस्त लेखिका म्हणून मृणालिनी देसाई यांचे नाव मराठी साहित्यात निश्चितच वरच्या दर्जाचे आहे.

त्यांनी केलेली वाङ्मय सेवा मराठी साहित्यात मोलाची भर घालणारी आहे असे जरूर म्हणावेसे वाटते. अशा या लेखिकेच्या 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा अभ्यास करताना त्यांच्या व्यक्तिपरिचयाचा आपणास उपयोग होतो.

'Style is a man himself' जसा लेखक तशी त्याची शैली. लेखकाचे साहित्य त्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते. जसे त्यांचे संस्कार, सभोवतालचे वातावरण तसेच त्याचे अनुभव विश्व बहरते. त्या अनुभूतींना आपल्या लेखनाद्वारे लेखक प्रगट करतो म्हणूनच मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा अभ्यास करत असाताना त्यांच्या अल्पचरित्राचा परिचय करून घेतला आहे.

क) साहित्यिक योगदान :-

'मृणालिनी देसाई' यांच्या साहित्यांचे विषय विविध अंगानी सजले आहेत, त्यांनी कथालेखन, कादंबरीलेखन, ललितगद्य, प्रवासवर्णन, बालसाहित्य, अनुवाद व आत्मचरित्र अशी एकूण ३६ पुस्तके लिहिली. त्यांच्या साहित्यातून प्रामुख्याने महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान, मूल्ये, आदर्श विचार प्रगट झालेले आहेत. त्यांनी हिंदी, गुजराती भाषेमध्येही लिखाण केलेले आहे. प्रारंभी त्यांनी बरीच चरित्रपर पुस्तके लिहिली. महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी आपली साहित्यसाधना केली. मराठी साहित्यात 'मृणालिनी देसाई' यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे.

## 'मृणालिनी देसाई' यांच्या साहित्यलेखनाचा मागोवा

| अ. नं. | 'कथा' साहित्य | प्रकाशन वर्ष | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १. | आन्दयात्रा | १९७३ | मनोहर ग्रंथमाला, पुणे. |
| २. | रूसत्रा | १९७६ | शांता बुध्दीसागर, सोलापूर. |
| ३. | सोस्लेले घाव | १९७६ | अनमोल प्रकाशन, पुणे. |
| ४. | बिंदी | १९७७ | साहित्य वसंत, सोलापूर. |
| | **'कादंबरी' साहित्य** | | |
| १. | बेडरूम | | इंद्रायणी साहित्य, पुणे. |
| २. | जिंदगी | | पुणे साहित्य वितरण. |
| ३. | इंद्र | | पुणे साहित्य वितरण. |
| ४. | अग्निदिव्य | | पुणे साहित्य वितरण. |
| ५. | मुक्ताई | | अनमोल प्रकाशन, पुणे. |
| ६. | गायत्री | | वाङ्मय शोभा, पुणे. |
| ७. | शोधू कुठे माधवा | १९७४ | मनोहर ग्रंथमाला, पुणे. |
| ८. | राखेतील निखारे | १९५४ | वोरा आणि कंपनी, मुंबई. |
| ९. | चिरयात्री | १९६१ | द. रा. सामंत, मुंबई. |
| १०. | भगवान परशूराम | १९७० | कुलकर्णी ग्रंथागारपुणे. |
| ११. | पुत्र मानवाचा | १९७१ | पॉप्युलर, पुणे. |
| १२. | योगिनी | १९७२ | मनोहर ग्रंथमाला, पुणे. |
| १३. | राज्घाट | १९७४ | सरोज प्रकाशन, नागपूर. |
| १४. | स्त्री | १९७४ | साहित्य वसंत, पुणे. |
| १५. | इनामदार | १९७५ | शांता बुध्दिसागर, कोल्हापूर. |
| १६. | बिल्वदल | १९७५ | शांता बुध्दिसागर, कोल्हापूर. |
| १७. | प्रितीची रीत | १९७९ | इंद्रायणी साहित्य, पुणे. |
| १८. | अग्निदिव्य | १९८३ | पुणे साहित्य वितरण. |
| १९. | दीपनिर्वाण | १९८३ | परिमल प्रकाशन, औरंगाबाद. |
| २०. | मराठ्याचा सरखेल - कान्होंजी आंग्रे | १९८४ | |



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## 'मृणालिनी देसाई' यांच्या साहित्यलेखनाचा मागोवा

| अ. नं. | आत्मचरित्र | प्रकाशन वर्ष | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १. | निशिगंध | १९६८ | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. |
| | **ललित गद्य** | | |
| १. | विराणी | १९६७ | मनोहर ग्रंथमाला, पुणे, |
| | **वैचारिक** | | |
| १. | प्रगतीच्या निकषावर | १९७७ | साधना प्रकाशन, पुणे. |
| | **बालसाहित्य** | | |
| १. | गीतगोविंदकार जयदेव | १९५७ | मनोहर ग्रंथमाला, पुणे. |
| २. | अलौकिक शिल्पकार - मायकेल एंजले | १९५९ | वोरा प्रकाशन, मुंबई. |
| ३. | मोत्यांचे पीक | १९६३ | वोरा आणि कंपनी, मुंबई. |
| ४. | कपीचे पराक्रम | १९६५ | वोरा आणि कंपनी, मुंबई. |
| ५. | कथा बा बापूंची | १९९२ | समाज शिक्षणमाला, पुणे. |
| | **अनुवाद लेखन** | | |
| १. | मेघाणी | १९६४ | साहित्य अकादमी, दिल्ली. |
| २. | जीवनसरिता | १९६४ | साधना प्रकाशन, पुणे, |
| ३. | सरस्वतीचंद्र | १९७३ | मनोहर ग्रंथ भांडार, पुणे. |
| ४. | सॉक्रेटिस | १९७६ | मनोहर ग्रंथ भांडार, पुणे. |
| ५. | दीपनिर्माण | १९८३ | परिमल प्रकाशन, औरंगाबाद. |
| | **अवर्गीकृत** | | |
| १. | वेद बोलिला अनंत | | म. रा. सा. सं. मंडळ |

## संदर्भसूची


१. देसाई मृणालिनी - 'निशिगंध'
पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती १९६८ उनि. पृ. क्र. १० .

२. 'स्त्री स हित्याचा मागोवा' - खंड २ इ. स. १९५१ ते इ. स. २०००
साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांचा संयुक्त प्रकाशन उनि. पृ. क्र.२०४ .

३. देसाई मृणालिनी - 'निशिगंध' उनि. पृ. क्र. २५ .

४. तत्रैव पृ. क्र. ९७.

५. 'संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश'इ. स. १९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड .

६. 'स्त्री साहित्याचा मागोवा' खंड-२ इ. स. १९२० पासून २००३ उनि. पृ.क्र.२०५.

७. देसाई मृगालिनी - 'बिन्दी' प्रकाशन - साहित्य वसंत, सोलापूर १९७७.

८. 'स्त्री साहित्याचा मागोवा' खंड-२ उनि. पृ.क्र. १४३ .

९. तत्रैव पृ. क्र.२०५ .




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.